नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/03/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण ७५,८८,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

## पोलीस स्टेशन उमरेड ची कारवाई

दिनांक ०३/०३/२०२३ रोजीचे रात्री २०.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, मांगरूळ मार्गे उमरेड कडे मोहपा फाटा वरून रेतीची चोरटी वाहतुक टिप्पर वाहनाने होत आहे. अशा माहितीवरून मोहपा फाटा जवळील एमआयडीसी परीसरात बीपीएड कॉलेज लगत रोडवर टिप्पर क्र. १) एम. एच—४०/ए.के—५९७० २) एम.एच—३१/सी.क्यु—६७१८ ३) एम.एच—४०/सी. डी—७९१७ चे चालकांनी विना परवाना (रॉयल्टी) आपल्या ताब्यातील टिप्परमध्ये रेती भरून रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने तिन्ही टिप्पर एकुण किंमती अंदाजे ७५,००,०००/—रू. मध्ये व तिन टिप्पर मधील एकुण २२ ब्रास रेती किंमती अंदाजे ८८,०००/—रूपयाचा मुद्देमाल असा एकुण ७५,८८,०००/—रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने पोलीस स्टेशन उमरेड येथे टिप्पर चालक आरोपी क्र. १) प्रणय नरेश मुनघाटे, वय २३ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड जि. नागपूर २) गुरूदयाल कांताप्रसाद सनोडीया, वय २८ वर्ष, रा. प्लॉट नं. ३४, नविन नगर, भवानी नगर, पारडी नागपूर ३) जगदीश मनोहर राउत, वय ३४ वर्ष, रा. हळदगाव ता. उमरेड जि. नागपूर यांचे विरूद्ध कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हे नोंद करण्यात आलेले असुन पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

तसेच टिप्पर क्र. एम.एच—४९/११४० चा चालक रितेश निलमचंद्र ठाकरे, वय २९ वर्ष, रा. प्लॉट नं. १६७, नविन नगर पारडी, भांडेवाडी नागपूर हा परवाना मध्ये नमुद पेक्षा अधिक रेतीची वाहतुक करतांना मिळुन आला. सदर टिप्पर ताब्यात घेवुन त्यावरील पुढील कारवाई करीता महसुल विभागाशी पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

सदर कारवाई मा. श्री. विशाल आनंद पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. भिमराव टेळे उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड यांचे मार्गदर्शनात श्री. प्रमोद घोंगे पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन उमरेड यांचे सोबत सहायक फौजदार रमेश त्रिपाठी, पोलीस हवालदार विष्णु जायभाये, पोलीस नायक रूपेश महादुले, प्रकाश मुटकुरे, पंकज बट्टे, राधेश्याम कांबळे पोलीस शिपाई आशिष खराबे, उमेश बांते यांनी केली आहे.




## अपघातात मृत्यु

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा गडमी फाटा येथे दिनांक ०३/३/२०२३ चे १२.०० वा. ते १३.०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे – हरिचंद्र उईक, वय ५० वर्ष, रा. पेंढरी** हा आपली मोटरसायकल टी. व्ही. एस स्पोर्ट एम. एच.– ४०/व्ही. एच.– ११७५ ने कोथूर्णा येथून खिळे घेवून पेंढरी कडे जात असतांना गडमी फाटया जवळ पेंढरी येथून विरूध्द दिशेने येणाऱ्या मोटरसायकल स्प्लेंडर क्र. एम. एच.– ४०/सी. एल–२३५५ चे चालक व आरोपी नामे– आशिष गणपत आहाके, वय १९ वर्ष रा. अजनी (भोरडी) ता. सावनेर याने आपल्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निश्काळजीपणे चालवून मृतक यांचे मो.सा ला जबर धडक देवून गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभूत ठरला तसेच मोटरसायकल स्प्लेंडर क्र. एम.एच ४० सी. एल–२३५५ चे मागे बसलेला शुभम गोपाल चचाने, वय २६ वर्ष याचे गंभीर जखमी होण्यास आरोपी मोटरसायकल चालक कारणीभूत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अजित हरीचंद्र उईके, वय २६ वर्ष रा. पेंढरी ह. मू अमरनगर हिंगणा नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी, सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री स.पो.नि खडसे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर